Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - III / Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | स्त्री सक्षमीकरण<br>**प्रा. डॉ. विश्वनाथ काशिनाथ सोनवणे** | ६१-६५ |
| १६ | स्त्री साहित्यीका अग्रणी: संत मुक्ताई, संत जनाई, संत कान्होपात्रा<br>**प्रा. डॉ. भालेराव जी. पी.**<br>**प्रा. डॉ. धारवाडकर डी. एस.** | ६६-७३ |
| १७ | सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण<br>**सहा. प्रा. किरणकुमार मोहन धिमधिमे** | ७४-७६ |
| १८ | बुडीत कर्जे भारतीय बँकिंग व्यवस्थे समोरील समस्या कारणे व उपाय<br>**प्रा. गजानन रहाटे** | ७७-८१ |
| १९ | महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या व उपाय<br>**प्रा. श्रावण ब. कापगते** | ८२-८६ |
| २० | स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण<br>**प्रा. डॉ. रविंद्र आर. सहारे** | ८७-९० |
| २१ | दहशतवाद : मानव निर्मित आपत्ती<br>**प्रा. कांबळे शिवाजी ईरबा** | ९१-९५ |
| २२ | आधुनिक शिक्षणाकडून असलेल्या अपेक्षा<br>**प्रा. अर्चना ज्ञानोबा अडसुळे**<br>**गणेश वासुदेव पानझाडे** | ९६-९९ |
| २३ | स्त्रीयांच्या समस्या : स्त्री-पुरुष असमानता<br>**प्रा. धारवाडकर दीपक सुधाकर** | १००-१०३ |
| २४ | रामदासी संप्रदाय<br>**प्रा. डॉ. राकेश दे. कभे** | १०४-१०७ |
| २५ | व्यापारी अधिकोषांची अर्थव्यवस्थेतील भूमिका<br>**प्रा. डॉ. विष्णू ब. पवार** | १०८-११० |
| २६ | अंगाई गीत व्यक्तिमत्व विकासाचा श्रीगणेशा<br>**डॉ. सुचित्रा शरद ताजणे** | १११-११५ |
| २७ | फीरते दुकानदार व स्थायी दुकानदार यांच्यामधील सामान्य खुशालीचा तुलनात्मक अभ्यास<br>**दिनेश जारोंडे** | ११६-११८ |

# १६. स्त्री साहित्यीका अग्रणी: संत मुक्ताई, संत जनाई, संत कान्होपात्रा

**प्रा. डॉ. भालेराव जी. पी.**
(इतिहास विभाग)
**प्रा. डॉ. धारवाडकर डी. एस.**
(समाजशास्त्र विभाग), तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगांव.

संत श्रेष्ठ ज्ञानदेवापासून संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत सावतामाळी यासारख्या पूरूष संताच्या नामावलीत संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा यासारख्या स्त्री संताचे स्थानही पुरूष संताऐवढे दिपस्तंभाप्रमाणे आहे. स्थिरता, मनाची शांती या सर्वांसाठी स्त्री संतरचरित्राचाही उपयोग होतो ही बाब तेवढीच खरी आहे. वैयक्तीक मानसिक समाधानातुन ईश्वरनिष्ठतेकडे वळून समाज स्थैर्यालाही त्यामुळे हातभार लागतो.

**संत जनाबाई** - विठ्ठलाची निस्सीम भक्ती जनाबाईनी केली. । कृतयुगातील पदमिनी,त्रेता,युगातील मंथरा,व्दापारयुगातील कुब्जा हीच नव्या जन्मात जनाबाई असेल.

मुक्ताबाई आणि जनाबाई या समकालीन मुक्ताबाई भोवती अदभुताचे वलय तर जनाबाई सर्वसामान्य स्त्री आहे. संत जनाबाई जवळ सहिष्णुवृत्ती आणि सर्वांशी स्नेहशील आदी गुण आढळतात. जनाबाई ही नामयाची दासी म्हणजे शिष्या पारिवारीक सदभाव-सत्संगातुन कसा आत्मविश्वास मिळविता येतो हे संत जनाबाईच्या संपन्न भावकवितेतुन पाहावयास मिळतो.

पंढरी क्षेत्र, श्री विठलाची अपूर्वाई, त्याच्या नामजपाच्या आंनद, सत्संगाची महती या विषयी लिहीतांना जनाबाई सहजपणे आपला जीवन संघर्षही सांगतात. भागवत संप्रदायाने पारमार्थीक ज्ञानापासुन दूर ठेवल्या गेलेल्या तळागाळातील वंचित बहुजन समाजाला जागविले. तेच काम जनाबाईनी केले.

जनाबाईंनी या भगवान श्रीकृष्ण रूप श्री विठलाचे रूपवर्णन न करता त्याच्या भक्त वस्तयलतेची अनेक रूपे अनुभवली आहेत. भक्त हदयाच्या व्दारांनीच तो आपल्या मर्त्यलोकात येत असतो हे दाखवून दिले. संतत्व आणि देवत्व या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. संत सज्जनच भागवंत आणि माणूस यांचे अव्दैत निर्माण करतात.

जनाबाईचा हा श्रीविठल लेकुरवाळा

विठो माझा लेकुरवाळा, संगे लेकरांचा मेळा
निवृत्ती हा खांदयावरी । सोपानाचा हात धरी
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर
गोरा कुंभार मांडियेवरी । चोखा जीवा बरोबरी
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा

विठलाच्या परिवारात सारे संत आहे याच्या खांदयावर निवृत्तीनाथ,सोपानाचा हात निवृत्तीनाथानी धरला, पूढे ज्ञानेश्वर मागे मुक्ताबाई, मांडीवर गोरा कुंभार, चोखा जीवा बरोबर, बंकाकडेवर,नामा करंगळी धरून आहे. हा भक्तांचा सोहळा सदैव साजरा होतो आहे. संत मंडळाच्या या समूहचित्रामध्ये जनाबाईचा आत्मप्रवेश विलोभनीय वाटतो. त्यातुनच समानतेचा संदेश पाहावयास मिळतो.

नामदेवांदी संताची आणि जनाबाईची विठू माउली एकच असली तरी जनाबाईंना वाटणारी माउली ही भक्ताला प्रितीभराने अर्लींगन देणारी, थकला भागला तर पाय चेपणारी, त्याच्या सुखानं सूखी दुःखानं दुःखी होणारी तसेच त्याच्या सहवासासाठी आतुरलेली वाटते. जनाबाईंनी नामदेवांच्या घरची कौटूंबिक क्षणचित्रे अतिशय चांगली टिपलेली आहे. यात दुमत नाही.

' नामदयाची जनी ` ही जनाबाईची केवळ अभंगमुद्रा नाही ती त्यांची खरी ओळखही आहे. संत नामदेवांचा सत्संग लाभल्याने आपले स्त्रीत्व,कूळ,गोत्र सारे बाजुला पडले. अशी भक्ती रूप भावना व्यक्त करते.

दासी जनी नाही आतां । देहभाव पुर्ण जाय तेव्हा हे धैर्य सुख होय ।

असा अव्दैतानूभव अनुभव जनाबाईंना अनुभवता आला. सोहं आत्मा प्रकट जो दाखवी वाट । वरिष्ठ तोचि जाणा अशा शब्दात जनाबाईंनी ऋण व्यक्त केले. जनाबाई दासी म्हणजे मोलकरीन नाही. त्या ईश्वराला दास भावाने शरण आलेल्या आणि नामयाची दासी म्हणजे नामदेव शिष्या आहेत. त्यांचाही पिंड नामदेवासारखाच आर्त भक्तांचा आहे. 'बाई मी लिहीणे शिकले सदगुरूरायापाशी `संत जनाबाई म्हणतात गुरूनी म्हणजे संत नामदेवांनी मला लौकीक पारमार्थिक शिक्षण दिले. सृष्टीचे स्वरूप वर्णन करणाऱ्या अभंगात जनाबई सारख्यांनी सांगितलेली तत्वे, पंचमहाभूते, त्रिगूण चार वाचा, जीवनाच्या चार अवस्था पंच ज्ञानेंद्रिये आणि पंच कर्मेद्रिये, पंचविषय असे उल्लेख करून गुरूप्रती उत्कट भावना व्यक्त करते. जनाबाईंना निवृत्ती नाथाचे परात्पर गुरू, गोरक्षनाथ यांच्या विषयीही उत्कट प्रेम वाटल्याने म्हटलेला पाळणा ज्ञानदेवांच्या नाथपरंपरेची एक साक्ष म्हणून लक्षात घेण्यासारखा आहे. ईश्वराच्या साक्षात्काराची अलौकिकता, गूढ अनूभंवाची सहज अभिव्यक्ती जनाबाईंनी ज्या सामर्थ्यांने प्रकट केली ती अजोड आहे. संत हे निःसंग वृत्तीचे असुन निर्लीप्त वृत्तीने जगतात. संतकाव्य बहूजनहिताय लिहीले गेले. संतांना देवानुभव आले ते त्यांनी सर्वांना सागितले. लोकांनाही त्याची अनूभूति यावी यासाठी त्यांनी आपल्या परभानुभूतीचे अभंग गायन केले. भगवंताची प्रचिती येण्यासाठी मन निर्मळ, वागणे सुमधूर , वासनांचा त्याग करून विशुध्द आचार विचार करावयास हवा असा आग्रह जनाबाईनी धरला.

जनाबाईंचे अभंग आशयसंपन्न असून एक वेळ मरोनिया जावे पण शरण विठोबासी व्हावे असे तीला वाटते. आसक्ती असू नये नाही तर फसगत अटळ आहे हेही नमुद करते. श्रीविठल हीच जनाबाईसाठी आंधळयाची काठी ठरली. जनाबाई आपल्या आर्त भक्तीभावानेनं उत्कट शब्दात विठलाला आढवित राहील्या नाहीत, त्याची विनवणही केली नाही तर त्याला भावपूर्ण वृत्तीनं आपल्या प्रत्यक्ष अनुभवलं

जनाबाईचे ३५० अभंग गाथेत मिळतात. नाम तारक त्रिभूवनी असा नामाया महिमा तीने जाणला होता. पांडूरंग नाम जप । हेचि माझे महातप असा तिचा विश्वास अभंगातुनच जाणवतो. स्त्री जन्म म्हणून औदासिन्याची बाधा जनाबाईंच्या मनात अधुन मधुन येत होती असे मत प्रा. श्री म.माटे. यांनी मांडले. अध्यात्मीक अधिकार प्राप्त झालेली व्यक्ती ही व्यावहारीक जगाच्या पलीकडे असते. स्त्री असो वा पुरूष असो अशा व्यक्तीला ऐहिक सुखदु:खे फारशी हलवू शकत नाही. असे अभ्यासपुर्ण मत डॉ. लिला दिक्षीत ने मांडले.

कान्होपात्राही विचारी, चिंतनशील, संवेदनशील व्यक्तीमत्वाची होती. भावगर्भ अभंगरचनेमुळे तीच्या रचलेल्या अभंगाची कल्पना सहज येते, अभंगनिर्मीती सोप्या,गेय,रसाळ कारूण्य आणि आर्ततेने ओथंबलेल्या अनुभावातुन लिहील्या गेल्यामुळे तीचे वेगळेपण अधोरेखीत होते. संत नामदेवांनी निर्माण केलेल्या आध्यात्मीक लोकशाहीतील वैशिष्टयपुर्ण संत कवियत्रि म्हणून वाङ:मय कोषात विशेष नोंद आहे.

शाम नावाच्या नायकिणीच्या पोटी पंढरपूर जवळ मंगळवेढा या गावात तीचा जन्म इ.स.१४६८ मध्ये झाला. विषयभोगाकडे कधीच आकर्षित न झालेली कान्होपात्रा ईश्वराच्या भक्तीकडे खेचली गेली. कान्हो, कान्हू असे नाव व पात्रा हे आडनाव असून व्यवसायदर्शक विशेषनाम आहे. संत कान्होपात्रा म्हणतात.

ज्याचे घेता मुखी नाम, हाकी पडे काळ यम

ऐसी नामाची थोरवी, उध्दारीले दुराचारी

संत कान्होपात्रा

नाचगाण्यातुन, शरीर विक्रयाव्दारे उपजीवीका करणाऱ्या शामाला असे वाटे की, आपल्या मुलीनीही हाच व्यवसाय निवडावा जेणेकरून खुप पैसा व प्रसिध्दी कमविता येईल परंतु कान्होपात्रा ही बंडखोर वृत्तीची होती. मनाला पटत नसणाऱ्या गोष्टींना तसेच स्वत: विरूध्दच्या गोष्टींना विरोध करणाऱ्याच्या तिच्या या चांगल्या अर्थाने केलेली बंडखोरीस दाद देणे क्रमप्राप्त ठरते.

वारकऱ्यामध्ये तसेच त्यांच्या भक्तीमध्ये जाती, धर्म, पंथ, स्त्रीपुरूष भेदांना धारा जाती, धर्म, पंथ, स्त्रीपुरूष भेदांना धारा नसल्याचे लक्षात आल्यानंतर तीची विठल भक्ती बहरू लागली. संत ज्ञानेश्वरांच्या तात्वीक भूमिकेमुळे विठल संप्रदायाने व्यापक रूप धारण केले. भक्तीच्या क्षेत्रात उच्च निच भाव नाही हा मानवतेचा पहिला जाहीरनामा ठरतो. त्या छत्राखाली सर्वहार समाजातील लोक भेदभाव विसरून एकत्र आले. ज्ञानाचे क्षेत्र मुक्त व भक्तीच्या पुर आला. त्याने अस्पृश्य जातीतील संत व वंचित उपेक्षित हीन जातीतील हीन व्यावसायीक संत स्त्रीयांना अधिष्टान मिळाले.

हरली भूक तहान निमाली,

संताची देखिल चरणांबुजे ,

किर्तनाचे रंगी आनंदे नाचता ,

कान्होपात्रा चित्ता समाधान

गणिकेच्या व्यवसायात पडण्याचा आईचा आग्रह झूगारून ती एकटी वारकऱ्याबरोबर पंढरपूरला गेली ही एक अध्यात्मीक क्रांतीच म्हणावी लागेल ही निश्चित शाश्वत खरे वाटते.

घ्यारे घ्यारे मुखी नाम, अंतरी धरोनिया प्रेम
माझा आहे भोळाबाप, घेतो ताप हरोनि
आपुलीया नामासाठी, घ्यावी संकटी लवला हे,
घ्यारे घ्यारे अनुभव, कान्होपात्रेचा माधव,

संत ज्ञानेश्वराच्या विरहिण्याचे अभंग आणि नामदेवांचे बालक्रिडेवरचे अभंग कान्होपात्राचे आवडीचे होते. ईश्वरभक्तीत आयुष्याची कृतकृत्यता मानणाऱ्या कान्होपात्रेने आर्त स्वरांनी विठ्ठलाला साकडे घातले त्यात ती कान्होपात्रा म्हणते,

नको देवराया अंत आता पाहू, प्राण हा सर्वथा जाउ पाहे
हरीणीचे पाडस व्याघ्रे धरियेले, मजलाही जाहले तैसे देवा
कान्होपात्रा

हरणाच्या पाडवाला वाघाने धरल्यावरचा हा दुष्टांन्त कान्हो पात्रेच्या मनस्थितीचे वर्णन करतो. आर्तता, आळवणी, हदयापासून ईश्वराला घातलेली करूण साद ही कान्होपात्रेच्या अभंग रचनांची मुख्य वैशिष्टये आहेत.

पतितपावना म्हणविशी आधी, तरी का उपाधी भक्तामागे,
तुझे म्हणविता दुजे अंगसंग, उणेपणा सांग कोणाकडे
सिंहाचे भातूके जंबूक पै नेता, थोराचीया माथा लाज वाटे. ।
म्हणू कान्होपात्रा देह समर्पण करावा जतन ब्रीदासाठीच

आम्हा भक्ताची लाज राख नाहीतर तुझ्याच नावात उणेपणा येईल असे म्हणत ती विठलास कोंडीत पकडते अर्थात विठलाची वरील भक्तीमुळे ही बाब अधोरेखित करणारी आहे. गायक संस्कारांमुळे व शिक्षणामुळे कान्होपात्राचे अभंग इतर स्त्रीसंतांच्या तुलनेत गेय आणि गायनानुकूल आहेत. कान्होपात्रेचे उपदेशपर अभंगाचा विषय वासनेचा निषेध होय. ज्ञानदेवाची भक्ती, मुक्ताबाईचा लाडिवाळपणा, जनाबाईची आळवणी, चोखोबांच्या उपेक्षेची टोचणी, नामदेवांची देवालाही कोंडीत पकडण्याची हातोटी कान्होपात्रेच्या अभंगात जुळून येते. एकत्रित जुळून येतात. संत कान्होपात्राला कोणतीही आध्यात्मीक पारमार्थीक पार्श्वभूमी नव्हती. ईश्वराची भक्ती आणि सात्विक अंतकरण हयांच्या आधारेच ती संतपदापर्यंत पोहोचली.

ज्ञानोत्तर भक्ती योगाभ्यासाने आध्यात्मीक उंची प्राप्त करून घेणाऱ्या इतरश्रेष्ठ वारकरी संतामध्ये केवळी भक्तीच्याच साहाय्याने संतपदाला पोहचेली कान्होपात्रा ही एकमेव होय. वारांगणा व्यवसायमध्ये स्त्रीदेह हेच भांडवल पण अशा गणिकेच्या पोटी जन्मुनही स्त्री चारित्र, शील यांना जपण्यासाठी आपली अब्रू वाचविण्यासाठी देहार्पण करण्याचा मार्ग कान्होपात्रेणे स्विकारला . म्हणून गावदासी न बनता खऱ्या अर्थाने ती देवदासी बनली हे स्पष्ट होते.

ज्ञानेश्वरांच्या कार्यामुळे निर्माण झलेल्या अध्यात्मीक लोकशाहीचा परिपाक म्हणजे कान्होपात्राचे जीवण आणि कार्यकर्तृत्व. वारकरी संप्रदायानेही वेश्येची कन्या, गणिकेची पुत्री म्हणून तिचे अभंग हलक्या दर्जाचे मानले नाहीत. तसेच इतर स्त्रीसंताबरोबरच तिला संतपद मिळाले. तिचे अभंग संप्रदायात समाविष्ठ करण्यात आले. कान्होपात्रेच्या निमित्याने/तिच्या जीवणातुन जाणवनारा संघर्ष, झगडा, त्यावर मात करून तिने घडविलेले सामाजीक उत्थापन हे अभ्यासण्याजोगे आहे. घाली गर्भवासा कान्होपात्रा म्हणजे , जन्मोजन्मी देखेन विठल चरण असे म्हणत विठलाची सेवा करण्यासाठी पुन्हा गर्भवास करण्याची तयारी दाखविणारी कान्होपात्रा. कान्होपात्रेच्या अभंगाच्या शेवटच्या चरणात धन्य कान्होपात्रा, विनवी पात्रा कान्हो, शरण कान्होपात्रा, कान्होपात्रा घ्याली, विनवितसे कान्होपात्रा, कान्होपात्रा दासी अशी तिची नाममुद्रा पाहावयास मिळते. संत कान्होपात्राच्या अभंगावर विठलाचे गूणवर्णन बाहयरूपवर्णन, आळंदी पंढरपूर सारख्या तीर्थस्थानांचे वर्णन, विठलाला मदतीसाठी मारलेली हाक आदीचा प्रभाव जाणवतो. संत कान्होपात्रावर प्राणाचे संकट, शीलभ्रष्टव्हायचे संकट, जीवनमरणाच्या या संकटातुन सोडविण्यासाठीची तीची आर्त हाक आहे. भौतिक ऐहिक ताणातुन तिला मुक्तता हवी आहे स्त्रीवादी दृष्टीकोणातुन कान्होपात्रेकडे बघायचे झाले तर कान्होपात्रेने घडविलेली ही एक सामाजीक क्रांती होती. भेदाभेद भ्रम अमंगळ या उक्तीमुळे वारकरी संप्रदायाचे स्थान वेगळे ठरते.

भविष्याची सर्व चिंता पांडूरंगार्पण करून आपला भूतकाळ सहजपणे मागे टाकूण कोणत्याही पाशात न अडकता ती एकटी घराबाहेर पडली. पांडूरंगाचरणी प्राण अर्पण करणे ही घटना तिच्या धैर्याचे प्रवाहाविरूध्द पोहण्याच्या वृत्तीचे आणि अत्युच्च भक्तीनिष्ठेचे प्रतीक ठरते. एखादया हक्कांच्या आणि जवळच्या व्यक्तीबरोबर आपण जसा रूसवा काढतो, अबोला धरतो तशीच पध्दत कान्होपात्रेने विठ्ठलाप्रती स्विकारली आहे. यातुनच तिच्या काव्यात्मक प्रगल्भतेची जाणिव होते.

तु माय माउली जगाची जननी,

म्हणोनी मिठी चरणी घालीतसे,

विनंती कान्होपात्रा जोडेनिया हात,

आता देहात समय पातलासे,

असे कडक शब्द या भक्तांनी देवासाठी वापरले ते तिच्या नितांत भक्तीच्या अधिकारातुन विठलाबदलचा त्याच्या संकट निवारणा बदल गाढ विश्वास यातुन प्रकट होतो. मुक्ताबाईने आपल्या नावाप्रमाणे म्हणजेच मुक्त शब्दाची मुक्तपणे उधळण करून त्यातील अन्वर्थकता तिने आपल्या नावाशी जोडलेली दिसतो. मुक्ताबाईची अभंगवाणी योगानुभक्ती प्रकट करणारी असल्याने ती विलक्षण वाटते. मराठीतील वारकरी परंपरेतील आद्य कवयीत्री मानली जाते. मुक्ताबाईची गुरुपरंपरा नाथपंथीय असून तीचे गूरू बंधू निवत्तीनाथ होते. मुक्ताईच्या अभंगास मुक्ताई अशी नाममुद्रा वापरलेली असून नामपर अभंग, संत माहत्मपर, उपदेशपर, पंढरी माहत्मपर, कूटात्म, मुक्ताई चांगदेव संवादपर, अंगाई गीत आणि ताटीचे म्हणून प्रसिध्द असलेले एवढया विविध विषयांच्या वैविध्याने नटलेले अभंग तीने रचले. नामसंकिर्तनासाठी तिने हरीपाठ रचला असून हरीपाठात उपदेशाची भाषा पौराणिक कथाचे दाखले, हरीनाम संचार विमोचन आदिचा समावेश आहे. हरीपाठाच्या साहयाने विठलचरणी

समरस होतांना मुक्ताई पुन्हा चिंतनातुन मुक्त होत असलेली जाणवते. मुक्त, मुक्तपण, मुक्ती, मुक्ताई जीवन्मुक्त मुक्तामुक्त असे आत्मदर्शक पुनरूक्त उल्लेख अभंगीतात आढळतात.

मुक्ताई मुक्त हरिनामसेवित

अवघेचि मुक्त सेविता हरि

संत मुक्ताई असे आत्मप्रतीदर्शक उदगार ती व्यक्त करते. मुक्ताईचे मन केवळ अंतर्मुखच नव्हे तर आत्मनिष्ठही बनते. सदगूरू प्रसादाने प्राप्त झालेल्या स्थितीचे अभंगातुन वर्णन करतांना त्याच्या आत्मस्थितीचे दर्शन घडते व तसेच ज्ञानस्थितीचे प्रतिपादन करते. ज्ञानानुभव देण्यापेक्षा ते ज्ञानबोध देतात म्हणजेच निर्मीतीच्या पातळीवर जाण्याऐवजी तार्किक, बौध्दीक पातळीवर जातात. म्हणून तो काव्यानुभव न ठरता ज्ञानचिंतनच ठरते. व्यक्त अव्यवक्त, सगूण निर्गूण, कुंडलिसहस्त्रदळी, शुन्याशुन्य, जीवीशीवी इ. सांकेतिक संज्ञा अभंगात पाहावयास मिळतात. प्रतिमाची भाषा काव्यातुन वापरली जाते.

शुन्यपरते पाटीतव शुन्य तेही नाही ।

पाहतो पाहेपण ठायी ठेवियले ।

प्रकती निर्गूण सगूण । दीपे दिपपूर्ण एकतत्वे

या उपदेशपर अभंगातुन मुकताई संसारबंधने सोडून हरीयाचा स्विकारते मुक्त शब्दाची प्रत्येक अभंगातील पुनरावत्ती तिच्या शैलीमुळे क्लिष्ट वाटत असली तरी त्यातुनच तिचे चिंतन व ज्ञान स्पष्ट जाणवते, परमार्थाप्रती तिच्या भावना निस्पह असून प्रपंचातील अवकळा आवरून आणि वेदना गिळून परमार्थाकडे तीने घेतलेली झेप तिचे वेगळेपण सिध्द करते.

संत ज्ञानेश्वरांनी एकदा समाजावर रूसून ताटी बंद करून आत स्वत-ला कोंडून घेतले तेव्हा योगी पावन मनाला ताटी उघडा ज्ञानेश्वरा, म्हणून तिने हाक मारली त्यातुन मुक्ताई कणखर स्त्रीमन त्यांचे भाव जीवन प्रामुख्याने आध्यात्मिक बंधानी अनुबंधित झालेले आहे. ताटीचे अभंग उत्कट भावाने परिप्लुप्त आहेत. तूम्ही तरूनी विश्वतारा असे आवाहन केले यातुन मुक्ताबाईची मानसीक उंची, वैचारीक परिपक्वता आणि संतत्वाचा अधिकार प्राप्त होतो.

चांगदेव हा मुक्ताईचा शिष्य होता. मुक्ताईने चांगदेवाला पाळण्यात घालू न झोके देवून जोजवल्याचे उल्लेख अभंग रचले यातुन स्त्रीसूलभ वात्सल्य प्रकट होते. शिष्य चांगदेवाला तान्हूले बाळ कल्पून त्याला अव्दैताच्या निद्रेसाठी ही मुक्ताई जोजवते. मुक्ताईचा अभंग अंगाई गीतासारखे आहे. चांगदेवाच्या निमीत्याने मुक्ताई मधील कोमल मातभाव प्रकट होतो. मुंगी उडाली आकाशी मधील मुंगी म्हणजे एक सामान्य जीव एक सामान्य स्त्री चिमुरडी मुक्ताई पण तिने विशात्मकलेला कवेत घेतले.

**संत जनाबाई**

जनाबाईच्या काव्यविश्वाचा आस्वाद घेताना त्यातील वात्सल्य कारूण्य, तिचे भावविभोर व्यक्तीमत्व स्त्री म्हणून असलेली भावविश्व सर्व भावनाटयासह पाहावयास मिळते. पृथगात्मता हा जनाबाईच्या काव्याचा विशेषता आहे.

प्रांरंभी आई गेली बाप गेला मज सांभाळी विठ्ठला ।

अशी एकाकी पणाची व्यथा मांडते. विठ्ठलाशी तादात्म्य पावते. जनाबाई विठ्ठलाला पिता, आई जीवलगा, सर्व सत्ताधीशाची भूमिका प्रदान करते. यातून विठ्ठलावरचा तिचा विश्वास दिसतो. विठ्ठलाच्या या प्रेमसाक्षात्काराने जनाबाईचे मन चैतन्ये भारुन जाते. सजगपणे ती बोलू शकते. साक्षात्कारानुभवाची वाट पाहणे, तळमळणे हेच जनाबाईच्या अभंगात प्रत्ययाला येते. जनाबाईच्या अभंगात मधुराभाव अत्यंत प्रत्ययकारीपणे प्रकटला आहे. विठ्ठलाच्या अलौकीक प्रेमानुभूमीव्दारे मानस पातळीवर व देह जाणिवेच्या स्तरावरही अनुभवते यातुनच तीचे स्त्रीत्व खऱ्या अर्थाने प्रत्ययाला येते. प्राणापेक्षा सत्याचे मोल अधिकच आहे. संतसंग आणि नाममंत्र यांच्या बळावर साधनावस्था सुरू होते. येगं येगं विठाबाई । माझे पंढरी चे आई या प्रसंगी जनाबाईच्या भावना अशा आहेत. आपण परित्यक्त आहोत याची खंत प्रकट करते. आत्मसंघर्षाला ती सामोरे जाते. अगतिकता, असहाय्यता,उत्कटता, तगमग, अधीरता यांचे दर्शन घडते. अन्याय विरूध्दच्या संघर्षात जास्त परखड होते. मनातील दबलेल्या रागाचा स्फोट होतो.ज्ञानेश्वर व त्याच्या भावंडाना जनाबाई अशा भावनेने पाहते त्यात ज्ञानदेव , महाविष्णु, निवृत्ती-शंकर, सोपान ब्रम्हदेव व मुक्ताई मुळमाया आदि रूपात त्यांना पाहते. कठोर आत्मपरीक्षण करून व्यवस्था नाकारून स्त्रीत्वाची मर्यादा व बंधने झुगारून सामाजीक मान्यतेला आव्हान देत मनगटावर तुम्ही तेल घाला इतक्या स्पष्टपणे प्रतिष्ठेला हादरा देणारी भाषा १३व्या शतकात एक स्त्री दासी करते यातच तिच्या बंडखोर व्यक्तीमत्वाचे दर्शन घडते.

डोईचा पदर खांदयावर देण्याच्या सुचक संकेता पासून ते वेसवा झाल्याचे प्रकट जाहीर करण्यापर्यंत होणाऱ्या मनोनिश्चयाचे येथे दर्शन घडते.

डोईचा पदर आला खांदयावरी / भरल्याबाजारी जाईन मी

असे म्हणून संसारातुन मनाने मुक्त व बंडखोर झालेली जनाबाई दिसते.

स्त्री जन्म म्हणूनि न व्हावे उदास/ साधुसंता ऐसे केले जनी असे ती स्पष्ट बजावते आत्मीक शक्तीचे तसेच सामर्थ्यांचे अनुभव प्रकट करते. प्रगाढ निष्ठा तिच्या अभंगातुन प्रकट जाणवते. जनाबाईच्या कवितेत आलेली स्त्रीगिते, पाळणे ही तर रूपक शैलीतील स्त्री विश्वातुन गहन अध्यात्म सूलभपणे सांगणारी स्त्रीसुलभ रचना होय. अभंगाला श्रमगीतांचे परिणाम लाभले दळणे कांडणे धुणे ही जशी स्त्रीयांची म्हणून दैनंदीन कार्ये आहेत. जात्याची नादवर्तने उखळाची तालबध्द कांडण्याची आवर्तने नदीचा खळखळाट गाईचे हंबरणे यातुन जनाईला नादरूपे सापडली. यातुनच तिचे रूपाक मन पाहावयास मिळते. संत जनाबाईच्या आख्यानक कार्याचा प्रभाव मुक्तेश्वरी रचना शैलीवर पडलेला दिसतो. जनाबाईच्या वाणीची प्रेमळता, प्रसादगुण स्त्रीमनाच्या दर्शनाची हळूवारता त्याच्या आख्यानातही आढळते. विठू माझा लेकूरवाळा, या अभंगातुन जनाबाईच्या प्रगल्भ सामाजीक जाणीव निर्माण होते. एक सर्वसमावेशक प्रेमळ मातृरूप त्यातुन साकारते सर्व जाती जमातीतील भक्तमंडळींना कौटूंबीक जिव्हाळयाने बरोबर घेउन जाणारा हा प्रेममय लेकूरवाळा विठल नव्हे तर विठाई जनाइ पाहते व समाधान व्यक्त करते अनुभव व भाषा स्त्रीमनाची जाणवते.

बंका कडेवर आणि चोख्याला हक्काशी धरले यातील वैचारीक सूक्ष्मता परिवर्तनवादी भूमिका मांडणारी आहे. दलीतांना उचलून कडेवर घेणारा हक्काशी घेणारा विठ्ठल समतेचे तत्त्वज्ञान अंगीकारतो. गौळण, भजनी गीत म्हणून तीचे अभंग वैशिष्ट्यपूर्ण आहे. संत जनाबाईच्या काव्यात काव्यात्मक गीतात्म, कथात्मक नाट्यात्मक, वास्तववादी व भास स्वप्न सृष्टीच्या निर्मितीच्या काव्य विशेषांचे दर्शन घडते. स्त्री जन्म म्हणून उदास न होण्याचे ती सांगते.

संदर्भ ग्रंथ

१. संपादक डॉ. स्नेहल तावरे- भारतीय संतांचे योगदान स्नेहवर्धन, प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २०१५

२. संपादक हरी श्रीधर शेणोलीकर, साहित्य अकादमी, नवी दिल्ली

३. सुभाष कि. देशपांडे पद्मगंधा प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती २०१६

४. नि.ना. रेळेकर, नामदेव चरित्र, अध्यक्ष समाजोन्नती परिषद, कोल्हापुर , प्रथम आवृत्ती १९७०

# २३. स्त्रीयांच्या समस्या : स्त्री-पुरुष असमानता

**प्रा. धारवाडकर दीपक सुधाकर**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली.

**प्रस्तावना**

स्वामी विवेकानंद " जो देश , राष्ट्र महिलांना आदर देत नाही, तो देश राष्ट्र बनू शकत नाही व त्या देशाला, राष्ट्राला भविष्यही नसते." स्त्री पुरुष समानता कागदावर जेवढी आहे तेवढी प्रत्यक्षात उतरलेली नाही आजच्या बाजारपेठ प्रधान जगामध्ये महिंलांकडे उपभोग्य वस्तु म्हणून पाहिले जात आहे. महिंलावरील अत्याचार बलत्कार यांच्या घटनांचा आलेख वाढता आहे. त्या तूलनेत शिक्षा होण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. याला भारतीय समाज देखील अपवाद नाही. स्त्रीयांच्या समस्येची कारणे समाज व्यवस्थेत फार पूर्वी पासून दडलेली आहेत. या अनुषंगाने स्त्रीयांचा सामाजिक दर्जा यावर दृष्टीक्षेप टाकणे आवश्यक ठरते.

समाजाचा विचार करता असे म्हणता येईल की, समाजात स्त्रीपुरुष संख्या सम आहे. परंतु स्त्रीयांचा दर्जा आणि भूमिका गौण आहे. प्रत्येक कालखंडात स्त्रीयांचा दर्जा दूयम होता. तो लिंगावर आधारित होता. त्या शालीन संवेदनशील प्रामाणिक त्यागमय मूर्तीस्वरूप गृहिणी असावी ही अपेक्षा होती. भारतीय समाजातील पारंपारीकतेचा विचार केल्यास असे लक्षात येते की, प्रदिर्घ काळापासून भारतात स्त्रीपुरुष विषमता अस्तीत्वात आहे. पाश्चिमात्यीकरण आधूनिकीकरण, नागरीकीकरण व जागतिकीकरण या सगळया प्रकियेनंतर देखील भारतीय समाजाच्या पारंपारीक मानसिकतेत बदल झालेला दिसून दिसत नाही. जे प्रश्न हजारो वर्षापूर्वी स्त्रीयांचे होते तेच प्रश्न आजही कायम असलेले दिसून येतात. बालविवाहाची समस्या हुंयाची समस्या, घटस्फोटाची समस्या, विनयभंगाची समस्या तसेच लैगिक शोषणाच्या समस्या मध्ये स्त्रीया आजही पिळून निघत आहेत.

भारतीय समाज कायद्यानुसार नव्हे तर पारंपारिकतेनूसार चालतो असे म्हटलास वावगे ठरू नये. भारतातील अनेक समाजसुधारकांनी ही पारंपारिक मानसिकता बदलण्यासाठी अहोरात्र प्रय्रत्न केल्याचे दिसून येतात. परंतु सद्य स्थितीत स्त्रीविषयक समस्यामध्ये फारसा बदल झालेला आढळून येत नाही. वर्तमानकालीन भारतीय समाजाचा विचार करता स्त्रीयांचा दर्जा वेगवेगळया कालखंडात वेगवेगळा राहीलेला दिसतो.

**संशोधन विषयाचे उद्‌देश**

1. स्त्रीयांच्या समस्येचे अध्ययन करणे.
2. स्त्रीयांचा भूतकालीन समाजातील परिस्थीती व दर्जाचे अध्ययन करणे.
3. स्त्रीयांच्या मध्ययूगीन काळातील परिस्थीती व दर्जाचे अध्ययन करणे.
4. स्त्रीयांच्या वर्तमानकालीन परिस्थीती व दर्जाचे अध्ययन करणे.

**संशोधन विषयक गृहितके**

1. समाजात स्त्रीयांच्या अनेक समस्या आहेत.

2. स्त्रीयांच्या समस्येत परिस्थीतीनूसार, काळानूसार भर पडत गेलेली आहे.
3. स्त्रीयांच्या समस्येची मूळे पारंपारीक मानसिकतेत दडलेली आहेत.
4. घटनेने स्त्रीयांना समान दर्जा दिला आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनाकरीता व्यष्टी अध्ययन पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून स्त्रीयांच्या समस्यांचे अध्ययन करताना विविध कालखंडाचा आढावा घेण्यासाठी पुस्तके, मासिके, इंटरनेट, यासारख्या दुयम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. तसेच वर्तमानकालीन समस्या समजावून घेण्यासाठी प्रत्यक्ष मूलाखत या प्राथमिक स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे.

1. वैदिक कालखंड – नारीपुजा,सतीपुजा, परदा, देवदासी
2. वेदोत्तर कालखंड– सतीप्रथा (जोहार), हुंडा, पुर्नरविवाह,बालविवाह
3. संतांचा कालखंड– हुंडाप्रथा, बालविवाह, विधवा विवाह, स्त्री सुरक्षा
4. ब्रिटीशांचा कालखंड– स्त्री शिक्षण, बालविवाह, विधवा विवाह
5. स्वातंत्र्योत्तर कालखंड– कौटूंबिक हिंसाचार, लैंगिक अपराध, समलींगी विवाह, लिंगभेद.

**वैदिक कालखंड**

इ.स.पूर्व 600 चा कालखंड हा वैदिक कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडात स्त्रीयांचा दर्जा पूरूषाच्या समान होता. म्हणजे स्त्री पुरूष समानता होती. स्त्रीयांना पुरूषांइतकेच सामाजिक व धार्मिक अधिकार होते. स्त्रीला पुरूषांची अर्धागिनी म्हटले जाते असे. स्त्रीकडून प्रजा व धर्म ही उदिष्ठे जोपर्यंत पूर्ण होत नाहीत तो पर्यंत पुरूषाला दूसरा विवाह करण्याचा अधिकार नव्हता. पुरूषांना बहूपत्नी विवाहाचा अधिकार नव्हता. एकपत्नी विवाह हा आदर्श विवाह मानला जात होता. या कालखंडात स्त्रीयांना उपनयन संस्कार करण्याचे यज्ञयागात सहभागी होण्याचा अधिकार होता.

**वेदोत्तर कालखंड**

इ.स. पूर्व 600 नंतरचा कालखंड हा वेदोत्तर कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडानंतर मनुस्मृतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. याच कालखंडात मनुने मनूस्मृतीची रचना केली. यत्र नारिस्तू पुजन्ते तत्र देवता रमन्ते. या श्लोकातून मनूने स्त्रीयांना देवातांचा दर्जा दिला. एकीकडे माता, भगीनी व पत्नी या भूमिकेतून सन्मानित केले तर दुसरीकडे शूद्र, 'पशू, ढोल और नारी, सद ताडणव के अधिकारी'' या श्लोकातुन स्त्रीला शुद्र मानून शिक्षा करण्याचे अधिकार दिले. स्त्रीला अबला म्हणून संबोधले स्त्रीने पुरूषांची गुलाम, दासी बनून जगले पाहिजे. तिला कोणतेही स्वातंत्र नव्हते. मनूने स्त्रियांचा उपनयन विधीचा धार्मिक अधिकार नाकारला. पर्यायाने स्त्रीयांचा शैक्षणिक अधिकार संपूष्टात आल्याने स्त्रीयांच्या सामजिक गूलामगिरीला सूरूवात झाली. याच बरोबर मनु असेही म्हणतो की, ''महिलांनी बालपणात तिच्या पित्याच्या, तारूण्यात तिच्या पतिच्या आणि वार्धक्यात मुलांच्या आज्ञेत रहावे.'' परस्परविरोधी लिखाणामूळे स्त्रीया धार्मिक शैक्षणिक सामाजिक अधिकारापासून वंचित होत गेल्या. या कालखंडात ख–या अर्थाने स्त्री दासी नव्हे तर भोगदासी म्हणून समोर आली.

**3. संतांचा कालखंड**

इ.स. 1300 ते 1600 असा जवळ जवळ साडेतिनशे वर्षाचा संताचा कालखंड स्त्रीविषयक चळवळीच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाचा आहे. या कालखंडातातील महात्मा बसवेश्वर, कबीर, सुरदास, तुलसीदास, तसेच नामदेव, तुकाराम या महाराष्ट्रातील संताचे कार्य नरसी मेहता, या गूजराथी संताचे कार्य महत्वपुर्ण तथा उलेखनीय आहे. संताच्या प्रबोधनात्मक चळवळीच्या माध्यमातून देशभर मोठया प्रमाणात धार्मिक व सामाजिक प्रबोधनास सुरुवात झाल्याचे दिसून येते.संताना स्त्री पुरुष उच्च निच जात या संकल्पना मान्य नव्हत्या. आपण सर्व जण एकाच ईश्वराची लेकरे आहोत आपण सर्व जण समान आहोत. कोणीही श्रेष्ठकनिष्ठ नाही अशी समतेची शिकवण या संताची होती. परंतू संताच्या कालखंडात स्त्रीयांचा दर्जा फारसा उंचावलेला दिसून येत नाही. कारण संताच्या नवीन परिवर्तनवादी विचारसरणीला समाजाच्या पारंपारीक मानसिकतेमूळे सर्व स्तरातून विरोध होत गेला. संतांकडून या विरोधाला प्रभावीपणे प्रतिउत्तर दिले गेले नाही. त्यामुळे प्रबोधनात्मक परिवर्तनवादी विचारसरणीचा अपेक्षित परिणाम झाला नाही.

**4. ब्रिटीशांचा कालखंड**

समतेचा दृष्टीकोण बिटीशांची देण आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. बिटीशांनी आपल्या कार्यप्रणालीतून सामाजिक समता या देशात प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. समतावादी कालखंडात राजा राममोहनरॉय, आगरकर, न्यायमूर्ती विद्यासागर, महात्मा ज्योतीबा फूले, छत्रपती शाहू महाराज, आगरकर, न्यायमूर्ती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व स्वातंत्र्यविर सावरकर, या विविध समाजातील सूधारकांनी समाजात नवीन विचारसरणी मांडण्यात सूरूवात केली. स्त्रीपुरूष समानतेच्या दृष्टीकोणातून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडों केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षणास सूरूवात केली. याच कालखंडात सती प्रथाबंदी तसेच विधवा विवाह कायदा स्त्री हितरक्षणाच्या बाजूने संमत करण्यात आला. स्त्री आणि पुरूषही समाजरथाची दोन चाके आहेत. ही दोन्ही चाके सबळ असल्याश्शिवाय समाजरथ व्यवस्थित चालू शकत नाही हे समाजसुधारकांच्या लक्षात आल्याने समाजप्रबोधनास सूरूवात झाली. या करीता त्यांनी सामाजिक रोषाची तमा देखील बाळगली नाही.

**5. स्वातंत्रप्राप्तीनंतरचा कालखंड'**

स्वातंत्रप्राप्तीनंतर भारताची राज्यघटना करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्वपूर्ण आहे त्यांनी काळाची पावले ओळखून काळाची गरज म्हणून स्त्रीपूरूष समानतेचे तत्व भारतीय घटनेच्या माध्यमातून राबविले. या अनुषंगाने त्यांनी खालील मूदयावर भर दिला.

1. लिंगभेदभाव केला जाणार नाही.लिंगभेदावर आधारीत कोणालाही अधिकार नाकारले जाणार नाहीत.
2. कोणत्याही पदाकरीता स्त्रीला ती स्त्री आहे म्हणून संधी नाकारता येणार नाही.
3. स्त्रीयांना मतदानाचा अधिकार दिला जाईल.
4. घटनेत स्त्रीयांचा दुर्बल घटकात समावेश करून स्त्रीयांना शैक्षणिक सवलती, राखीव जागा आणि अन्य विशेष सोयी देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

स्त्रीयांचे सर्व प्रकारचे प्रश्न सोडवून त्यांची सर्वागीन उन्नती करण्यासाठी 1953 मध्ये मध्यवर्ती केंद्रीय समाजकल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली.

**निष्कर्ष**

1. दिवसें-दिवस स्त्रीयांच्या समस्यात वाढ होत आहे.
2. ब्रिटीशाच्या कालखंडापासून ख-या अर्थाने स्त्रीयांच्या समस्येकडे गांभीर्याने पहाण्यास सुरवात झाली.
3. भारतीय धर्मग्रंथांनी स्त्री विरोधी लिखाणात भर टाकल्याणे स्त्री समस्यात वाढ झाली.
4. भारतीय घटनेत स्त्री पुरूष समानता या तत्वाला मान्यता दिली आहे.

**संदर्भसूची**

1. आधुनिक भारत मे सामाजिक समस्यीए – डॉ. महेशकुमार परदेशी/ दीपक धारवाडकर इशिका पब्लीकेशन हाउस, जयपूर – 2016
2. मानव अधिकार व महिलीए – डॉ. राजबालासिंह, अविष्कार पब्लिशर्स, जयपूर 2016
3. महिला लैंगिक असमानता : एक अपराध – प्रज्ञा शर्मा, अविष्कार पब्लिशर्स, जयपूर 2016
4. Understanding Social Exdusion – Hill & pachouri , Oxford Unipress 2002
५. नव्या शतकातील महिला धोरणे व अमलबजावणी – गो–हे निलम, स्त्री आधार केंद्र पूणे 1995

Special Issue, January- 2019

International Multilingual Refereed Research Journal

/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# VIDYAWARTA®

2012-19

## NAGNATH ARTS, COMMERCE & SCIENCE
College Aundha (N.) Dist.Hingoli (M.S.)

Sponsored

**ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE ON**

# New Education Policy & Higher Education

Monday 28th January, 2019

◇ Organized by ◇

Department of Commerce

**NAGNATH ARTS, COMMERCE & SCIENCE**

College Aundha (N), Dist.Hingoli (M)

◇ Organising Secretry ◇

Dr.V.S.Kanwate

Principal

◇ Convener ◇

**Dr.Ganesh N.Bokare**

Head Department of Com

27) Quality Higher Education : Achievements And Failure
**Dr. Padamwar U. D., Nanded** || 81

28) Development Quotient with respect to Industrial Exposure of ...
**Radhika Khairnar, Dr. Vijay Uttarwar** || 83

29) Trend of Women's Higher Education in India
**Dr. Shalinee Uttamrao Kadam, Nanded** || 86

30) Entrepreneurship Development of Rural Women through Self ...
**Dr. S. R. Dhembre, Hingoli** || 89

31) Women Empowerment Through Women And Child Development Programme
**Seema S. Shinde, Saurabh P. Yeolikar, Nanded** || 95

32) Relationship Between Higher Education And Women Empowerment ...
**Dr. Pradeep S. Jadhav, Basmath** || 97

33) लोकप्रशासनातील नवविचार प्रवाह
**सुभाष किशनराव पोले, हिंगोली** || 102

34) Role and importance of Higher Education in India: Myth and Reality
**Mr. Totawar P. R., Dr. Akashe S. M., Aundha (Nag)** || 105

35) Role of Indian Financial System in Economic Development of India
**Dr. B. B. Lakshete, Hingoli** || 107

36) Higher Education and Roll of UGC
**Dr. S. G. Chavan, Dr. S. B. Mane, Parbhani** || 112

37) Challenges and Opportunities: Higher Education System in India
**Mr. Rathod V. B., Dr. Deokate S. P., Aundha** || 115

38) शिक्षणातील नवोपक्रम आणि विचारप्रवाहांचे महत्व
**डॉ. एस. बी. माने, परभणी** || 117

39) Women Empowerment Through Swayam Shikshan Prayog (Ngo) ...
**Dr. Ranjeet V. Tehra, Geeta H. Walvekar** || 120

40) स्त्री सबलीकरण आणि उच्च शिक्षण
प्रा. डॉ. भालेराव जी. पी., प्रा.डॉ. धारवाडकर डी. एस., हिंगोली || 124

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

5. Linking rural energy with productive uses can create employment opportunities; rise income levels and improves quality of life in rural areas.

6. Women's perspectives are to be included in designing and implementing macro-economic and social policies by institutionalizing their participation in such processes. Women's contribution to social & economical development as producers and workers is to be recognized in the formal and informal sectors (including home based workers) and appropriate policies relating to employment and to her working conditions will be drawn up. Such measures could include:

**CONCLUSIONS**

The study conducted in this paper clearly exhibits that SSP helped women entrepreneurs in many ways to start entrepreneur activities. Due to multidimensional support especially in the field of sanitation, organic farming, drinking water, & renewable energy the socio-economic level of those women increased substantially. Many private entities like banks, corporate & Government too is accepting the significance of the work & ready to give hand to work with. Perhaps one of the most important emerging lessons is that women's groups themselves, in their social aspects, play a role in such empowerment. This argues for placing emphasis on sustaining groups beyond the life of the project, which indeed was done in this instance. The project evaluation also recommended that communication support (films, radio broadcasts and so on, with sensitization and training content) be used to speed up the empowerment process.

• **REFERENCES**

1. www.sspindia.org
2. www.energysaving.pdf
3. www.wikipedia.org
4. www.abhinavjournal.com
5. www.chilasa.org
6. www.afkinsider.com
7. www.idrf.org
8. http://www.disasterwatch.net ❑❑❑

**40**

# स्त्री सबलीकरण आणि उच्च शिक्षण

प्रा. डॉ. भालेराव जी. पी.
इतिहास विभाग

प्रा.डॉ. धारवाडकर डी. एम.
समाजशास्त्र विभाग

तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगांव, ता.सेनगांव जि.हिंगोली

**प्रस्तावना -**

भारताच्या संविधानात स्त्री-पुरुष भेद टाळून समानतेचे तत्व हा नागरिकांचा मुलभूत हक्क मानण्यात आला आहे. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमासाठी स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाच्या ४५व्या कलमानुसार १४व्या वर्षापर्यंत सर्व मुलांसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण ही राज्यसंस्थेची जबाबदारी ठरविली गेली आहे. १६ व्या कलमानुसार सार्वजनिक रोजगारामध्ये लिंगभेद नसावा. याची तरतुद केली गेली. १५(३) या कलमाव्दारे स्त्रियाच्या विकासासाठी खास कल्याणकारी कायदेशीर तरतुद व्हावी अशी भूमिका मांडली आहे.

**लेखाचे उदिष्टये :-**

१. भारतीय राज्यघटनेतील महिला विषयक कलमांचा अभ्यास करणे.
२. स्त्री सबलीकरणासाठी करावयाच्या बाबींचा आढावा घेणे.
३. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या परिस्थीतींचा मागोवा घेणे.

**गृहितके-**

१. भारतीय संविधानाने स्त्रीयांना पुरूषा एवढाच अधिकार बहाल केलेला आहे.
२. विद्यापीठ अनुदान आयोगाने मुलींच्या उच्च शिक्षणाचे दारे खूली केली.
३. स्त्री सबलीकरणासाठी अनेक उपक्रम राबविले जात आहे.

**संशोधन पध्दती :-**

सदरील संशोधनाकरीता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला असुन या अनुषंगाने गटचर्चा व व्यक्तीगत

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.41012 Vidyawarta® January 2019 Special Issue


स्तरावर चर्चा करण्यात आली तसेच ग्रंथालयातील विविध ग्रंथ,मासिके, वर्तमानपत्रे यांचाही शोध निबंधासाठी आधार घेण्यात आला. संगणक व इंटरनेट सारखे प्रभावी माध्यमाची मदत घेतली.

पार्श्वभूमी :-

लॉर्ड विल्यम बेंटीकच्या कारकीर्दीत लॉर्ड मेकॉले यांनी केलेल्या शिफारशीनुसार भारतात पाश्चात्य शिक्षणाचा प्रारंभ झालेला होता. सर चार्ल्स वुड यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गटण करण्यात आले त्यात अलेक्झांडर डफ, सर चार्ल्स, टेव्हेलीयन जॉर्ज मार्शमेन आदि सदस्य मंडळी होती. समितीच्या अहवालानुसार शिक्षण विषयक योजना तयार करून लॉर्ड डलहौसी यांच्याकडे १९ जुलै १८५४ रोजी सुपुर्त केला. या योजनेत चार्ल्सवुड यांनी शिक्षण प्रसारासाठी, शिक्षण दर्जा सुधारण्यासाठी पुढील शिफारशी केल्या स्त्रीयांच्या शिक्षणास प्रोत्साहन दयावे. स्त्रीया मुलांना संस्कारक्षम बनवितात. इ.स. १८५७ मध्ये मुंबई, कोलकत्ता, मद्रास या ठिकाणी विद्यापीठे स्थापन केली तसेच प्रत्येक जिल्हयात प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरु केली. मुलींच्या शिक्षणासाठी डलहौसीने स्वखर्चाने कोलकत्ता येथे बेथ्युन कॉलेज नावाची संस्था काढली.

महिलाचे सबलीकरण म्हणजे सत:वंचीत व संधीवंचीत महिलांना कोणत्याही भेदभावा शिवाय प्रगती करण्याची संधी देणे होय. पारलो फ्रिरे यांनी सर्व प्रथम महिलांचे सबलीकरण ही संकल्पना उपयोगात आणली. Closing the gender Gap : Educating girls या अहवालात प्रत्येक देशातील महिला शिक्षण निर्देशांक दिलेला आहे. जगात सर्वाधिक महिला शिक्षण निर्देशांक फ्रान्सचा आहे. महिलांच्या शिक्षणात सहभाग वाढावा यासाठी उच्च शिक्षण घेणाऱ्या गरीब मुलींना शिष्यवृत्ती सूरू करावी. मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढण्यासाठी प्रत्येक तालुक्यात मुलींचे वस्तीगृह काढले जावे. व्यावसायीक कराप्रमाणे महिलां शिक्षण कर हा सर्व प्रकारच्या कर्मचारी शासकीय, खाजगी तसेच व्यावसायीक व्यक्तींकडून घेतला जावा. महिलांच्या शिक्षणासाठी उद्योग क्षेत्रातुन व्यक्तींकडून केलेली गुंतवणूक आयकर मुक्त मानली जावी. महिलां सबलीकरणाचे यश समाजाच्या सकारात्मक प्रतिसादावर पूर्णपणे अवलंबून आहे. त्यास धोरणाची काटेकोर अंमलबजावणी देखील निर्णायक गरजेची आहे.

स्टुडंटर्स लिटररी ॲन्ड सायंटीफिक सोसायटी या सन १८४८ मध्ये स्थापन झालेल्या संस्थेने मुलींच्या शिक्षणाच्या कार्याला खऱ्या सुरुवात केली. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतर कमी अधिक प्रमाणात भारतातील अधिकृत शैक्षणिक कमिशने स्त्रीयांसाठी स्वतंत्र भिन्न अभ्यासक्रमाची शिफारस केल्या. भारतीय स्त्रीयांना शिकविताना भारतीय पुरुषांना दुखावून केले जावू नये यांची काळजी घेतली जावी. स्त्रीयांचा व्यक्तीमत्वाचा विकास न करण्यापेक्षा चांगल्या आया, चांगल्या बायका घडवून त्यातुन देशाची सामाजिक प्रगती व्हावी अशा आशावादी हेतू दिसतो.

शैक्षणीक क्षेत्रात वावरणारी माणसे विद्यापीठीय पातळीवरून बौध्दीक क्षमतांचा विस्तार करण्यासंदर्भात विद्यापीठ महत्वाची भूमिका बजावू शकतात. त्या अनुशंगाने सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रीशिक्षणाच्या मुदयाला स्पर्श केला. हंसा मेहता, दुर्गाबाई देशमुख यांनी स्त्री शिक्षणा संदर्भात समिती अनेक शिफारशी केल्या. मुंबईच्यास. एन. डी.टी. विद्यापीठात १९७३ साली पहिले स्त्री अभ्यास केंद्र प्रस्थापित झाले. संशोधन डॉक्युमेंटेशन, नवे प्राथमिक अभ्यासक्रम यावर स्पष्टपणे भर दिला. स्त्रीयांच्या शिक्षणावर भर देण्यापासून स्त्री अभ्यासातुन स्त्रीया जे जीवन जगतात, अनुभवतात त्याला उच्च शिक्षणातील अभ्यासाच्या पातळीवर अधिकृत दर्जा मिळाला.

महाराष्ट्र शासनाने देखील उच्च शिक्षणामध्ये मुलींचा सहभाग वाढावा यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. त्यात महाराष्ट्रा राज्य शासन निर्णय क्र. जी.ई.सी. १०००/१२३/२००० तांशि/ दिनांक १७ एप्रिल २००० नुसार प्रारंभीच्या शासन निर्णय अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३० टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. महिलांना पदवी अभ्यासक्रमाकरीता ३०टक्के जागा राखीव ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमाकरीता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्यात आल्या. सदरील आरक्षण सर्व पारंपारीक विद्यापीठे व त्यांना संलग्नीत असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३०टक्के जागा आरक्षीत केल्या आहेत.

**निष्कर्ष :-**

भारतीय संविधानाने स्त्री पुरूष हा भेद न मानता. समानतेचे तत्व पूर्णपणे स्विकारलेले दिसते. ब्रिटीश काळापासून स्त्री च्या उन्नतीसाठी वेळोवेळी प्रयत्न झालेले दिसतात. बहुतांश ब्रिटीश अधिकारी स्त्रियांविषयी उदारमतवादी होते व त्या अनुशंगाने अनेक सोयीसवलती प्रदान केल्या सदयस्थीतीत भारत सरकार देखील याबाबत सजग असून उच्च शिक्षणाची सोय व्हावी यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने शासन आदेश काढून पदवी स्तरापर्यंत शिक्षण मुलींसाठी खुले केले.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. महिला सबलीकरण स्वरूप समस्या - डॉ. गोटे प्रा. गव्हाणे शुभांगी वरद प्रकाशन, औरंगाबाद.
२. भारतातील सामाजिक समस्या - डॉ. सुधा काळदाते, पिंपळापुरे प्रकाशन नागपूर १९७०.
३. आधुनिक भारत के सामाजिक समस्याए डॉ. धारवाडकर, डॉ. परदेशी ईशिका पब्लीकेशन हाउस, जयपूर

The starting point for the new education policy must necessity be a clear articulation of the meaning and goals of education in the objectives which we seek to achieve though the new education policy?

What knowledge, skills and other qualities do we seek to instil though education? What kind of citizen should emerge as end product of the education system? What attribute should an educated citizen posses in order to be able to function as an informed and unlighted member of society?

Indexed

IMPACT FACTOR 5.131 iijif

Cosmos IMPACT FACTOR 5.234

Published By

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

ISSN-2319 9318